**बहि:शाल शिक्षण मंडळ**
**शैक्षणिक वर्ष : २०१९ - २०**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, बहिःशाल शिक्षण मंडळ अंतर्गत यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेचे आयोजन दि. २०/०१/२०२० ते दि. २२/०१/२०२० या कालावधीत करण्यात आले. व्याख्यानमालेचे उद्धाटन सोमवार, दि. २०/०१/२०२० रोजी बहिःशाल वक्ते प्राचार्य डॉ. स्वप्निल निर्मळ यांच्या व्याख्यानाने करण्यात आले. "शैक्षणिक, सामाजिक आणि कौटुंबिक स्वास्थ्य" या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. सर्वच क्षेत्रांत कमालीचे आणि वेगाने बदल घडत आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी शैक्षणिक स्वास्थ्याबरोबरच आपले सामाजिक आणि कौटुंबिक स्वास्थ्य देखिल समतोल राखणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

या व्याख्यानमालेत दुसरे व्याख्यान मंगळवार, दि. २१/०१/२०२० रोजी डॉ. प्रसाद जोशी यांनी दिले. "जग जिंकू या संवादाने" या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आज मानसा मानसांमधिल संवाद कुठेतरी हरवत चाललाय. प्रेम, जिव्हाळा, आत्मियता यांची जागा स्वार्थाने घेतली आहे. त्यामुळे समाधान लोप पावत असल्याचे त्यांनी सांगितले.

या व्याख्यानमालेचा समारोप बुधवार, दि. २२/०१/२०२० रोजी डॉ. सुमतीलाल धाडीवाल यांच्या व्याख्यानाने करण्यात आला. "ताण-तणावाचे व्यवस्थापन" या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. आजच्या धावपळीच्या व जीवघेण्या स्पर्धेत शारिरीक आणि मानसिक आरोग्य संतुलित ठेवायचं असेल तर त्यासाठी ताण-तणाव मुक्त राहाणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी वाचन, लेखन, पर्यटन याबरोबरच योग करण्याचेही त्यांनी सुचविले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा व्याख्यानमाला आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. पूर्वी गुरुकुल शिक्षण पध्दती प्रचलित होती. विद्यार्थी गुरूंच्या आश्रमात जाऊन ज्ञानार्जन करीत होता. त्यामुळे त्या ज्ञानाचे मोल विद्यार्थ्यांना होते. आज अनेक प्रकारच्या सेवा सवलती विद्यार्थ्यांना देऊनही त्याप्रमाणात शैक्षणिक परतावा विद्यार्थ्यांकडून येताना दिसत नसल्याबद्दल प्राचार्य डॉ. चंद्रकांत

दिघावकर यांनी खंत व्यक्त केली. ते पुढे असेही म्हणाले की, महाविद्यालयीन शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतर ख-या अर्थाने त्याच्या संघर्षाला सुरूवात होत असते. या संघर्षात तो टिकून राहण्यासाठी व आपला ईप्सित मार्गक्रमण करण्यासाठी प्रत्येक शिक्षक हा विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी प्रयत्न करत असतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बहिःशाल शिक्षण मंडळाचे केंद्रकार्यवाह डॉ.किरण पिंगळे यांनी केले व या व्याख्यानमालेतील सर्व उपक्रमांचा आढावा घेतला.

या व्याख्यानमालेप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विनीत रकीबे, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. किशोर निकम, मराठी विभाग प्रमुख प्रा. विद्या सुर्वे, प्रा. ललित राऊत, प्रा. सीताराम मुरकुटे तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**डॉ. किरण पिंगळे**
**केंद्रकार्यवाह**
**बहि:शाल शिक्षण मंडळ**